खाजगी विनाअनुदानित बी.एन. ॲण्ड वाय.एस., बी.ए.एस.एल.पी., बी.एस्सी.इन पी.एम.टी., डिप्लोमा इन पी.एम.टी., बी.एस्सी. (ऑप्टोमेट्री), डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री व डिप्लोमा इन ऑप्थॉल्मिक सायन्सेस या अभ्यासक्रमाचे पदवी/ पदविका नवीन महाविद्यालय सुरू करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे यासाठी “प्रस्ताव छाननी शुल्क” निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एमईडी २०१७/प्र.क्र. २१० (भाग-ब)/१७/शिक्षण १**

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१

तारीख: ३० सप्टेंबर, २०२०

**वाचा :-**

१. शासन निर्णय, क्र. एमईडी-१३९८/प्र.क्र.१८०/९८/शिक्षण-१, दि. १० नोव्हेंबर, १९९८.

२. शासन निर्णय, क्र.एमईडी-१३०१/प्र.क्र.३३/२००१/शिक्षण-१, दि.१६ ऑगस्ट, २००२.

३. शासन निर्णय,क्र.एनयुआर२०११/प्र.क्र.७७९/११/शिक्षण-१, दि.१९ जानेवारी ,२०११.

४. शासन निर्णय, क्र.एमईडी २०११/प्र.क्र७८०/११/शिक्षण-१, दि.१९ जानेवारी, २०१२.

५. शासन निर्णय, क्र. डब्लुपीएम२०१६/प्र.क्र.२०७/१६/शिक्षण-१, दि.१९जूलै,२०१७.

६. शासन निर्णय, क्र. एमईडी २०१७/प्र.क्र.१८४/१६/शिक्षण-१, दि.१६ ऑगस्ट, २०१७.

७. शासन निर्णय,क्र. एमईडी २०१७/प्र.क्र.२१०/१७/शिक्षण-१, दि.२६ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना :-

खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व तत्सम, निमवैद्यकीय तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी नवीन महाविद्यालय सुरू करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे यासाठी देण्यात येणाऱ्या आवश्यकता प्रमाणपत्रासंबंधी सुधारित कार्यपद्धती व सक्षमता तपासणीसाठी प्रस्ताव छाननी शुल्क पुर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून संदर्भ क्र.७ येथिल दि.२६.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये बी.एन. ॲण्ड वाय.एस., बी.ए.एस.एल.पी. आणि बी.एस्सी.इन पी.एम.टी. पदवी/पदविका या अभ्यासक्रमांचे छाननी शुल्क निश्चित करण्यात आलेले नव्हते.

२. तसेच, सद्य:स्थितीत शासनामार्फत दि.१६.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार बी.एस्सी.ऑप्टोमेट्री पदवी, डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री व डिप्लोमा इन ऑप्थॉल्मिक सायन्सेस या पदविका अभ्यासक्रमाचे छाननी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. तथापि, बी.एस्सी.ऑप्टोमेट्री पदवी, डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री व डिप्लोमा इन ऑप्थॉल्मिक सायन्सेस अभ्यासक्रमाचे छाननी शुल्क हे इतर अभ्यासक्रमाशी समकक्ष असणे अपेक्षित आहे.

३. त्यानुसार, खाजगी विनाअनुदानित बी.एन. ॲण्ड वाय.एस., बी.ए.एस.एल.पी. आणि बी.एस्सी.इन पी.एम.टी. पदवी/पदविका या अभ्यासक्रमांचे प्रस्ताव छाननी शुल्क निश्चित करणे तसेच, यापूर्वीचा "ऑप्टोमेट्री पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी छाननी शुल्क निश्चित करण्याबाबत" या विषयाचा दि.१६.०८.२०१७ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करून बी.एस्सी.ऑप्टोमेट्री पदवी, डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री व डिप्लोमा इन ऑप्थॉल्मिक सायन्सेस अभ्यासक्रमांचे नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यासाठी प्रस्ताव छाननी शुल्क निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

खाजगी विनाअनुदानित बी.एन. ॲण्ड वाय.एस., बी.ए.एस.एल.पी. आणि बी.एस्सी.इन पी.एम.टी.पदवी/पदविका तसेच बी.एस्सी.ऑप्टोमेट्री पदवी, डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री व डिप्लोमा इन ऑप्थॉल्मिक सायन्सेस या अभ्यासक्रमांचे नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यासाठी यापुर्वीचा दि.१६.०८.२०१७ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे प्रस्ताव छाननी शुल्क निश्चित करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | सध्याचे छाननी शुल्क (एक रकमी ना परतावा) | सुधारित छाननी शुल्क (एक रकमी ना परतावा) | प्रत्येक त्रुटीपुर्ततेसाठी पुनर्छाननी शुल्क (एक रकमी ना परतावा) |
|---|---|---|---|---|
| १) | बी.एन. ॲण्ड वाय.एस. | - | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| २) | बी.ए.एस.एल.पी. | - | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| ३) | बी.एस्सी.इन पी.एम.टी.* (पदवी/पदविका) | - | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| ४) | बी.एस्सी.ऑप्टोमेट्री / डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री /डिप्लोमा इन ऑप्थॉल्मिक सायन्सेस | रू.१,५०,०००/- | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |

*बी.एस्सी. इन पी.एम.टी. या अभ्यासक्रमासंदर्भात दि.१९.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक विषयाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी स्वतंत्रपणे सदर छाननी शुल्क निश्चित

करण्यात येत आहे. तसेच या प्रत्येक विषयाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रस्तावासाठीदेखिल सदर छाननी शुल्क लागू राहील.

२. उपरोक्त प्रमाणे निश्चित करण्यात आलेले प्रस्ताव छाननी शुल्क सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल. ज्या संस्थांनी महाविद्यालय सुरु करण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून या अगोदर प्रस्ताव सादर केले असतील परंतु ज्यांना अद्यापही, आवश्यकता प्रमाणपत्र/ ना-हरकत प्रमाणपत्र / मान्यतेचा शासन निर्णय देण्यात आलेले नाही, अशा संस्थांनांही छाननी शुल्कासंबंधीचे सदरचे आदेश लागू राहतील.

३. छाननी शुल्क भरण्याबाबतची कार्यपध्दती दि.२६.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणेच राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००९३०११५४२७६२१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=30ec04f686f0e87515c68a42bc5df9353c8af939ef1a35539184495da3e943c6, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL
Date: 2020.09.30 15:37:55 +05'30'

(डॉ.श्री.पुं.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
८. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१०. अधिष्ठाता/ प्राचार्य सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.
११. सचिव (वै.शि.), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (शिक्षण-२), वै.शि व औ.द्र. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).